# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष व शिफारशी

5 प्रकरण पाचवे

## निष्कर्ष व शिफारशी

### अ) निष्कर्ष :

5.1. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादावरून :

1. एम्. ए. डी. एड्. शैक्षणिक पात्रता असलेल्या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण ( 47.04 ) इतके होते. बी. ए. डी. एड्. शैक्षणिक पात्रता असलेले प्रशिक्षणार्थी प्रतिशत ( 23.42 ) इतके होते. त्यामध्ये पुरूष प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण जास्त ( 17.54 ) इतके होते.
   बी. ए. झालेले स्त्री व पुरूष प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण प्रत्येकी ( 11.76 ) इतके होते.
   बी. एस्सी. शैक्षणिक पात्रता असलेले प्रशिक्षणार्थी प्रतिशत ( 5.88 ) इतके होते.
   बहुसंख्य प्रशिक्षणार्थी पदवीधर व डी. एड्. होते.

2. विद्यार्थी शिक्षकांमध्ये वीस वर्षापेक्षा अधिक अध्यापन अनुभव असलेले प्रतिशत ( 5.88 ) इतके शिक्षक होते. प्रतिशत 17.64 इतके विद्यार्थी हे सोळा ते वीस वर्ष अध्यापन अनुभव असणारे होते. सर्वात जास्त प्रमाण हे अकरा ते पंधरा वर्ष अध्यापन अनुभव असलेले शिक्षकांचे प्रतिशत प्रमाण ( 41.17 ) इतके होते. तर प्रतिशत 29.41 इतक्या शिक्षकांचा अध्यापन अनुभव सहा ते दहा वर्ष होता.

3. पाठयक्रम एक व पाठयक्रम तीन अवघड वाटणा-यांचे प्रतिशत प्रमाण प्रत्येकी 41.17 इतके म्हणजे सर्वाधिक आढळले तर पाठयक्रम दोन हा प्रतिशत 17.64 विद्यार्थ्यांना अवघड वाटतो. पाठयक्रम चार व पाठयक्रम पाच अवघड वाटणारे प्रतिसादक समान प्रतिशत 5.88 इतके होते.

4. डी. एड्. साठी झालेल्या अभ्यासक्रमाचा उपयोग पाठयक्रम पाचसाठी होतो असे 96.07 प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत होते तर पाठयक्रम तीन साठी 39.51 प्रतिशत पाठयक्रम दोन साठी 31.37 प्रतिशत, तर पाठयक्रम चार साठी 19.60 प्रतिशत प्रतिसादकांनी उपयोग केला. **कोणता** भाग झाला याची नावे दिलेली नाहीत.

5. विविध संदर्भग्रंथांचे वाचन करणारे प्रशिक्षणार्थी तुलनेने कमी आहेत. पाठयक्रम एकसाठी म. बा. कुंडले यांचे शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र या संदर्भग्रंथांचे वाचन करणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण 17.64 प्रतिशत इतके **आढळले**. पाठयक्रम दोन साठी वा. ना. दांडेकर यांचे पुस्तक प्रतिशत 21.56 इतके विद्यार्थी करतात तर पाठयक्रम तीन करिता दोनच संदर्भग्रंथांचे वाचन करणा-या प्रशिक्षणार्थींचे प्रतिशत प्रमाण 11.76 इतके दिसून आले. पाठयक्रम चार करिता फक्त प्रतिशत 7.84 विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचत असल्याचे कळविले तर पाठयक्रम पाच साठी फक्त एन्. सी. ई. आर्. टी. ची पुस्तिका 11.76 प्रतिशत विद्यार्थी उपयोगात आणतात. यावरून बहुसंख्य प्रशिक्षणार्थी संदर्भग्रंथांचे वाचन करीत नाहीत ते फक्त पूर्णतः पुस्तिकेचाच अभ्यास करतात असे आढळले.

6. संदर्भग्रंथ न वाचणा-या कारणांमध्ये वेळ नाही हे 47.05 प्रतिशत विद्यार्थ्यांचे, तर पुस्तिकेतील माहिती पुरेशी वाटल्याचे 29.41 प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत आढळले. परंतु संदर्भग्रंथ वेळेत उपलब्ध होत नसल्याने त्याचे वाचन होत नाही असेसुद्धा 11.76 प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत होते. यावरून संदर्भग्रंथ वेळेवर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता तसेच संदर्भग्रंथ वाचकांसाठी प्रोत्साहनपर कार्यक्रम / योजना राबविण्याची गरज प्रकर्षाने आढळली.

7. मुक्त विद्यापीठाच्या पाठयक्रम पुस्तिकेतील भाषेच्या संदर्भात पुस्तिकेतील भाषा सुबोध आहे असे 70.58 प्रतिशत प्रतिसादकांचे मत आढळले तर प्रतिशत 23.52

प्रतिसादकांना पुस्तिकेतील भाषा कठीण वाटली. उत्तर न देणा-यांचे प्रमाण 5.88 प्रतिशत इतके आढळून आले. यावरून अध्ययन पुस्तिकेची भाषा सुबोध आहे परंतु शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान या पुस्तिकेतील पारिभाषिक शब्दांमुळे भाषा अतिशय अवघड जाते हे दिसून आले.

8. महाविद्यालयांमध्ये / केंद्रामध्ये वेळोवेळी येऊन शिक्षक प्रशिक्षकांचे मार्गदर्शन घेणारे 47.05 प्रतिशत विद्यार्थी आढळले. परंतु 35.29 प्रतिशत विद्यार्थ्यांचा प्राध्यापकांशी संपर्क कमी येत असल्याने त्यांना मार्गदर्शन घेणे अवघड वाटल्याचे दिसते. मार्गदर्शनाच्या बाबतीत 17.64 प्रतिशत विद्यार्थी उदासीन आढळले.

9. बहुसंख्य म्हणजेच प्रतिशत 58.82 प्रशिक्षणार्थींना निवांत व योग्य व अभ्यास करण्यास योग्य ठिकाण आहे तर 35.29 प्रतिशत विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी योग्य ठिकाण नाही. 5.88 प्रतिशत इतके विद्यार्थी उत्तराबाबत उदासीन आढळले.

10. निवांत जागा नसल्यामुळे प्रतिशत 5.88 इतके विद्यार्थी शेतात, प्रतिशत 11.76 पहाटे व रात्री जागून, 5.88 प्रतिशत प्रतिसादक सुट्टीत अभ्यास करतात. यावरून त्यांना अध्ययनाचे महत्व पटल्याचे दिसून येते. 11.76 प्रतिशत प्रतिसादकांनी अभ्यास करण्याची ठिकाणे कळविली नाहीत.

11. अभ्यासक्रमाचा कालावधी किती असावा याबद्दलची प्रतिसादकांची मते अजमावली असता 47.05 प्रतिशत प्रतिसादक तीन सत्रांची तसेच हा कालावधी चार सत्रांचा असावा असे 47.05 प्रतिशत विद्यार्थी मत प्रकट करतात. तर सहा सत्रांचा कालावधी योग्य ठरेल असे 3.92 प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत आढळते. 1.96 प्रतिशत म्हणजे फारच कमी प्रतिसादकांना कालावधी आठ सत्रांचा असावा असे वाटते.

12. सुट्टीमुळे अभ्यास चांगला होतो असे 27.44 प्रतिशत विद्यार्थी, तर सुट्टीत अभ्यास करणे कंटाळवाणे वाटले असे 11.76 प्रतिशत विद्यार्थी आढळले. तर सुट्टीतल्या अभ्यासाबाबत 60.74 प्रतिशत विद्यार्थी उदासीन होते.

13. अभ्यास करताना येणा-या अडचणींमध्ये शालेय कामकाज अडचण ही महत्वाची अडचण 33.33 प्रतिशत प्रतिसादकांना वाटली तर त्या खालोखाल 23.52 प्रतिशत विद्यार्थ्यांना सांसारिक अडचणी आल्याचे दिसून आले. त्याखालोखाल 17.64 प्रतिशत विद्यार्थ्यांच्या मनाची एकाग्रता होत नसल्याने अभ्यास होत नाही. त्या व्यतिरिक्त विस्मरण ( 5.88 प्रतिशत ), मुलांचे शिक्षण 5.88 प्रतिशत, संदर्भाशिवाय अभ्यास 1.96 प्रतिशत व प्राध्यापकांचे वेळेवर मार्गदर्शन नसणे 7.84 प्रतिशत, या अडचणी आढळल्या. त्यामुळे शालेय कामकाज व सांसारिक अडचणी यातून प्राध्यापकांचे वेळेवर मार्गदर्शन न मिळाल्याने अभ्यासावर वाईट परिणाम झालेला दिसून येतो.

14. स्वतःला आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी प्रतिसादकांनी सुचविलेल्या उपायांच्या वर्गीकरणामध्ये प्रत्येकी 23.52 प्रतिशत विद्यार्थी अध्यापकांचे मार्गदर्शन घ्यावे व सतत थोडा अभ्यास करावा या मताचे आढळले. तर 15.68 प्रतिशत विद्यार्थ्यांनी सत्रामध्ये वाढ हा उपाय सुचविला. इतर उपायांमध्ये चर्चा, वेळेचे नियोजन व प्रापंचिक अडचणींवर मात, संदर्भग्रंथांचे वाचन, प्रत्येकी 5.88 प्रतिशत इतक्या विद्यार्थ्यांनी सुचविले आहेत.

15. सुट्टीतील सत्रामुळे बहुसंख्य 82.35 प्रतिशत विद्यार्थ्यांना कौटुंबिक कामाकरिता पुरेसा वेळ मिळत नाही. तर 11.76 प्रतिशत विद्यार्थ्यांनी वेळ पुरेसा असल्याचे मत व्यक्त केले. यावरून कौटुंबिक कामासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने त्याचा परिणाम अध्ययनावर निश्चितच होत असल्याचे दिसून आले.

16. सैद्धांतिक भागाचा प्रात्यक्षिकासाठी उपयोग होतो असे बहुसंख्य 88.23 प्रतिशत प्रतिसादकांचे मत आढळले तर फार थोडया म्हणजे 5.88 प्रतिशत प्रतिसादकांचे याविरूद्ध मत होते. 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांनी उत्तर दिले नाही. यावरून सैद्धांतिक भाग हा प्रात्यक्षिकाकरिता उपयोगी पडतो हे दिसून आले.

17. पाठयक्रम एक मधील प्रात्यक्षिक भाग पूर्ण केल्यानंतर त्याच्या अहवाल लेखनासाठी तीन आठवडयापेक्षा जास्त कालावधी असावा असे 88.23 प्रतिशत प्रतिसादकांचे मत होते तर प्रत्येकी 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांना कालावधी पुरेसा आहे असे वाटले. यावरून अहवाल लेखनासाठी पुरेसा कालावधी देणे आवश्यक आहे हे दिसून येते.

18. केंद्राकडून अहवाल लेखनासाठी पुरेसा कालावधी दिला जातो असे मत 58.82 प्रतिशत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले तर 35.29 प्रतिशत विद्यार्थ्यांनी अपुरा कालावधी मिळतो असे मत केले. यावरून बहुसंख्य विद्यार्थ्यांना कालावधी पुरेसा मिळालेला असल्याचे दिसून आले.

19. लेखन कालावधीकरिता आलेल्या सूचनांमध्ये प्रत्येकी 23.52 प्रतिशत सूचना या शैक्षणिक व कौटुंबिक स्वरूपाच्या आढळल्या. तर प्रत्येकी 17.64 प्रतिशत सामाजिक व शासकीय स्वरूपाच्या होत्या. आरोग्यविषयक सूचना 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांनी केल्या.

20. विद्यार्थ्यांचा वृत्तेतिहास या प्रात्यक्षिकाकरिता प्रतिशत 49.01 इतक्या विद्यार्थ्यांनी अभ्यासात अतिप्रगत असणा-या विद्यार्थ्यांची तर 11.76 प्रतिशत प्रतिसादकांनी अभ्यासात अप्रगत असलेल्या विद्यार्थ्यांची निवड केली. यावरून अभ्यासात अतिप्रगत असलेल्या विद्यार्थ्यांच्या निवडीकडे कल जास्त दिसून आला. त्याचबरोबर उत्तर ने देणारे 39.21 प्रतिशत इतके विद्यार्थी होते.

21. बहुसंख्य प्रतिसादकांनी ( 52.94 प्रतिशत ) विद्यार्थ्यांची मुलाखत त्यांच्या घरी घेतली. तर प्रतिशत 39.21. प्रतिसादकांनी शाळेत मुलाखत घेतल्याचे दिसून आले. इतरत्र मुलाखत घेणारे अत्यल्प 3.92 प्रतिशत प्रतिसादक होते. त्यामुळे बहुसंख्य प्रतिसादकांना घरी व शाळेत मुलाखत घेणे सोयीस्कर वाटल्याचे आढळले.

22. मुलाखत घेत असताना सत्यता लपविली जाते. या अडचणीला तोंड द्यावे लागल्याने बहुसंख्य प्रतिसादक म्हणजे 64.70 प्रतिशत तर इतर अडचणींमुळे, कौटुंबिक, उत्तर न देणे, लाजाळूपणा, मानसिक दृष्टीने तयार नसणे, या प्रत्येकी 5.88 प्रतिशत प्रतिसादकांनी मत व्यक्त केले. त्यामुळे खरी उत्तरे देण्यास विद्यार्थी तयार नसल्याचे दिसून येते.

23. विद्यार्थ्यांच्या अनुभवावरून यशस्वी मुलाखत घेण्यासाठी त्यांनी सुचविलेल्या उपायांमध्ये गुप्तता बाळगणे व मित्रत्वाच्या भावनेने मुलाखत घेणे हे उपाय प्रत्येकी 35.76 प्रतिशत विद्यार्थी आहेत. तर ती सुट्टीच्या दिवशी घ्यावी असे मत देणारे प्रतिशत 11.76 प्रतिशत विद्यार्थी आढळले. यावरून मुलाखती गुप्त राहतील याची खात्री दिल्यास व मित्रत्वाच्या भावनेने मुलाखत घेतल्यास ती यशस्वी होते, याकडे बहुसंख्य प्रतिसादकांचा कल दिसून आला.

24. विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण करणारे बहुसंख्य म्हणजे 82.35 प्रतिशत प्रतिसादक होते तर 11.76 प्रतिशत प्रतिसादक हे विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यात अयशस्वी ठरले. 5.88 प्रतिशत प्रतिसादक हे उत्तराबाबत उदासीन होते.

25. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी बहुसंख्य ( 78.43 प्रतिशत ) पालक सहकार्य करतात तर 15.68 प्रतिशत पालकांनी प्रतिसादकांना पुरेसे सहकार्य केले नाही. यावरून पालकांना आपल्या पाल्याच्या अडचणी सोडविण्याकरिता शिक्षकांच्या चाललेल्या प्रयत्नांबद्दल आस्था दिसून आली.

26. मानसशास्त्रीय प्रयोगांच्या बाबतीत घरी व महाविद्यालयामध्ये केलेल्या **प्रयोगांची नावे** कोणत्याही प्रतिसादकांनी दिली नाहीत. त्यामुळे विद्यार्थी याउलट याबाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून आले. विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे प्रयोग पूर्ण केले आहे असे सर्व ( 100 प्रतिशत ) प्रतिसादकांनी मत व्यक्त केले आहे.

27. मानसशास्त्रीय प्रयोगांचा 94.11 प्रतिशत प्रतिसादकांना दैनंदिन अध्यापनाकरिता उपयोग झाल्याचे दिसून आले तर 5.88 प्रतिशत प्रतिसादक हे उदासीन आढळले. या उपयोगाच्या स्वरूपांचे वर्गीकरण केले असता त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र कळते असे बहुसंख्य ( 58.82 प्रतिशत ) विद्यार्थ्यांनी म्हटले होते. तर इतर उपयोगांमध्ये शैक्षणिक व मानसिक प्रक्रिया घडते ( 17.64 प्रतिशत ), अध्यापनाशी निगडीत शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी 11.76 प्रतिशत व 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांना **अवघड** विषयांचे अध्यापन करताना उपयोग झाल्याचे दिसून आले.

28. अंतर्गत चाचणीतील गुणांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी संबंधित वर्गाचा वर्गशिक्षक म्हणून वर्ग निवडला असे 41.17 प्रतिशत प्रतिसादकांचे मत दिसून आले तर 23.52 प्रतिशत विद्यार्थ्यांनी सहज उपलब्ध होता म्हणून **निवडलेल्या** नमूद केले आहे. यावरून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी स्वतः वर्गशिक्षक असल्याने व सहजासहजी उपलब्ध झाल्याने वर्ग निवडल्याचे दिसून आले. उत्तर न देणारे 35.29 प्रतिशत प्रतिसादक होते.

29. मूल्यमापन कृतीसत्राचे आयोजन होते असे 100 प्रतिशत प्रशिक्षणार्थींनी म्हटले.

30. पाठयपुस्तकाचे चिकित्सक परीक्षण करण्यासाठी **निवडलेल्या इयत्ता** बहुसंख्य विद्यार्थी शिक्षकांनी उल्लेख केलेलाच नाही. ( 58.82 प्रतिशत ) तर पाचवीची

प्रतिशत 5.88, सहावीची प्रतिशत 11.76 व सातवीची प्रतिशत 11.76 इतक्या प्रतिसादकांनी निवड केली.

31. शैक्षणिक तंत्रज्ञान हा ऐच्छिक विषय निवडलेल्या प्रतिसादकांचे प्रमाण प्रतिशत 5.88 इतके आढळले. परंतु त्यापैकी कोणीही प्रात्यक्षिकाचे नाव व कारण दिलेले नाही. लोकसंख्या शिक्षण हा ऐच्छिक विषय निवडलेले 41.17 प्रतिशत प्रतिसादक आढळले. त्या सर्वांनी सक्ती होती म्हणून तसेच शैक्षणिक क्षमता व कामगार क्षमता वाढविण्याकरिता सर्वेक्षण हे प्रात्यक्षिक निवडल्याचे कळविले आहे.
प्रौढ व अनौपचारिक शिक्षण हे ऐच्छिक विषय निवडलेले 41.17 प्रतिशत विद्यार्थी आढळले. त्यांनी निरक्षरतेचे निर्मूलन ही काळाची गरज असल्याने निरक्षर प्रौढास साक्षर करणे हे प्रात्यक्षिक निवडल्याचे सांगितले.

32. सूक्ष्म अध्यापनाच्या कृतीसत्राचे आयोजन व सूक्ष्म अध्यापन पाठांचे दिग्दर्शन होते असे 100 प्रतिशत प्रतिसादक कळवितात तर कौशल्याच्या निदानामध्ये कमी पडण्याची कारणे कोणत्याही प्रतिसादकानी दिलेली नाहीत. निवडलेल्या कौशल्यांच्या बाबतीत महाविद्यालयाने दिलेल्या गटातील आवश्यक तेवढी निवडली असे 100 प्रतिशत प्रतिसादकांनी कळविले होते.

33. निवडलेल्या कौशल्यापैकी चेतक बदल हे कौशल्य अप्रगत असणारे 15.68 प्रतिशत विद्यार्थी, प्रश्न विचारणे हे कौशल्य अप्रगत राहिले आहे म्हणणारे 13.72 प्रतिशत विद्यार्थी आढळले. इतर कौशल्यांमध्ये मागास असणारांचे प्रमाण अत्यल्प आहे तर प्रश्न विचारणे, प्रबलीकरण व चेतक बदल ही कौशल्ये प्रगत झाल्याचे प्रत्येकी 11.76 प्रतिशत इतके विद्यार्थी कळवितात. इतर कौशल्ये प्रगत असणारांचे प्रमाण अत्यल्प आढळले.

34. सरावपाठांचे दिग्दर्शन महाविद्यालयात होते असे 100 प्रतिशत प्रतिसादक कळवितात. ( सर्व अध्यापन पद्धतीचे पाठ ) यावरून महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या अध्यापन पद्धतीचा नमुना सरावपाठाचे दिग्दर्शन करतात असे आढळले.

स्वतः अध्यापन करीत असलेल्या शाळेत सरावपाठ घेताना 23.52 प्रतिशत प्रतिसादकांना पर्यवेक्षणाची सोय नाही ही अडचण आली तर तेवढेच प्रतिशत विद्यार्थ्यांनी अडचणी आल्याच नसल्याचे मत व्यक्त केले. वेळ अपुरा ( 17.64 प्रतिशत ), शैक्षणिक साहित्य अपुरे ( 5.88 प्रतिशत ), तर भीति वाटल्याचे 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले.

35. केंद्रातील सरावपाठ व शाळेतील सरावपाठ यामधील फरक स्पष्ट करताना 41.18 प्रतिशत प्रतिसादकांनी केंद्रात दबाव आल्याने सरावपाठावर परिणाम होतो असे मत व्यक्त केले. तर 23.52 प्रतिशत प्रतिसादकांनी विद्यार्थी अनोळखी असल्याचे सांगितले होते. तज्ज्ञ निरीक्षक असतात तसेच तयारी खूप करावी लागते असा प्रत्येकी 11.76 प्रतिशत प्रतिसादकांनी फरक सांगितला.

36. साहाध्यायांच्या पाठांच्या निरीक्षणाबाबत बहुसंख्य म्हणजे 88.23 प्रतिशत प्रतिसादक निरीक्षण करतात तर निरीक्षणाबाबत उदासीन असणा-यांचे प्रमाण प्रतिशत 11.76 इतके आढळले.

37. साहाध्यायाच्या पाठाच्या निरीक्षणाकरिता बहुसंख्य विद्यार्थी (88.23 प्रतिशत) केंद्राने पुरविलेल्या मुद्यांचा आधार घेतात तर 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांनी हरबार्टच्या पंचपदीचा आधार घेतला.

38. अभिरूप अध्यापनाचा पाठ घेताना 41.17 प्रतिशत विद्यार्थ्यांना वातावरणातील गोंगाटाचा व केंद्रात एका वेळी अनेक पाठ असल्याने 5.88 प्रतिशत विद्यार्थ्यांना

त्रास झाला. प्रतिशत 11.76 विद्यार्थी साहाध्यायांना विद्यार्थी समजणे अवघड गेले. प्रत्याभरणाचा कालावधी पुरेसा (58.80 प्रतिशत) म्हणजे बहुसंख्य विद्यार्थ्यांना वाटले. तर प्रतिशत 34.28 इतक्या विद्यार्थ्यांनी हा कालावधी पुरेसा नाही अशी खंत व्यक्त केली

अभिरूप अध्यापनाचा अहवाल विविध **अध्यापन** पद्धतीच्या मदतीने व मागदर्शन घेऊन लिहिणारांचे प्रमाण प्रत्येकी प्रतिशत 23.52 इतके आढळले. तर मुद्यांना अनुसरून ( 17.64 प्रतिशत ) व पुस्तिकेच्या मदतीने ( 11.76 प्रतिशत ) विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले.

39. केंद्राने आयोजित केलेल्या सर्व सहशालेय उपक्रमांना प्रतिशत 100 इतका प्रतिसाद विद्यार्थ्यांनी दिलेला आढळला. परंतु त्यांच्या सहशालेय उपक्रमांच्या उपयोगासंबंधी मतप्रदर्शन एकाही प्रतिसादकाने केलेले नाही.

40. महाविद्यालयीन स्तरावरील समाजकार्यामध्ये बहुसंख्य ( 94.11 प्रतिशत ) विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता व स्वच्छ करण्याचे काम केले तर प्रतिशत 23.52 प्रशिक्षणार्थींनी **प्रयोगशाळा** सफाईकरिता मदत केली.

प्रतिसादकांनी स्वतःच्या शाळेत ( प्रतिशत 67.48 ) परिसरसफाई हा उपक्रम राबवून वृक्षारोपण 23.52 प्रतिशत प्रतिसादकांनी तर अत्यल्प 9.80 प्रतिशत प्रतिसादकांनी रस्ता तयार करण्याचे प्रात्यक्षिक घेतले. यावरून सहज जमेल असा उपक्रम निवडण्याकडे कल दिसून आला.

41. कार्यानुभवाकरिता केंद्राने ठरवून दिलेले उपक्रम त्या त्या गटात जवळजवळ 100 प्रतिशत प्रतिसादकांनी पूर्ण केले आहेत. या उपक्रमांचा शिक्षण व्यवसायासाठी उपयोग होतो असे बहुसंख्य ( 82.36 प्रतिशत ) प्रतिसादक आढळले. तर उत्तर न देणा-यांचे प्रमाण **17.64** इतके होते. यावरून कार्यानुभव उपक्रमाचा उपयोग जाणून ते पूर्ण करण्याची आस्था विद्यार्थ्यांमध्ये दिसून आली. बहुसंख्य विद्यार्थ्यांना प्रतिशत ( 82.36 प्रतिशत ) हे प्रात्यक्षिक आर्थिकदृष्ट्या परवडणारे वाटले.

LIBRARY ... UNIVERSITY ... KOLHAPUR

42. स्वाध्यायांची तयारी करण्याकरिता पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ यांची मदत घेणारे बहुसंख्य प्रतिसादक आढळतात. ( प्रतिशत 76.47 ) तर इतर घटकांची मदत घेणारे प्रतिसादक अत्यल्प आढळले. यावरून संदर्भग्रंथांची गरज व त्यांचा वापर यामध्ये विद्यार्थ्यांच्या मतामध्ये व वर्तनामध्ये तफावत आढळते.

संपर्कसत्रातील चाचणीचा बहुसंख्य विद्यार्थ्यांना 94.11 प्रतिशत उपयोग होतो तर उत्तर देण्यात 5.89 प्रतिशत विद्यार्थी उदासीन आढळले.

चाचणीचा उपयोग वार्षिक परीक्षेच्या तयारीसाठी 25.49 प्रतिशत विद्यार्थ्यांना, अभ्यासक्रमाचे व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कळण्यासाठी 31.37 प्रतिशत विद्यार्थ्यांना तर अभ्यासास चालना मिळण्यासाठी 17.84 विद्यार्थ्यांना झाला. प्रतिशत 23.52 इतक्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढलेला दिसून आला. यावरून चाचणी ही सर्व विद्यार्थ्यांकरिता उपयुक्त ठरते, हे दिसून आले.

**एकंदरीत** विश्लेषणावरून प्रात्यक्षिकाकरिता वेळ कमी दिलेला दिसून आला.

5.2. प्राध्यापकांच्या प्रतिसादावरून :

1. प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेच्या विश्लेषणावरून एम्. ए., एम्. एड्., एम्. फिल्. झालेले 28.57 प्रतिशत तसेच एम्. ए., एम्. एड्. पीएच्. डी. झालेले 14.29 प्रतिशत व एम्. एस्सी., एम्. एड्., एम्. फिल्. झालेले 14.29 प्रतिशत प्राध्यापक दिसून आले. यावरून बहुसंख्य प्राध्यापक हे उच्चशिक्षित होते. एम्. ए., एम्. एड्. 21.43 प्रतिशत, बी. एस्सी., एम्. एड्. 14.29 प्रतिशत, तर एम्. एस्सी., एम्. एड्. 7.14 प्रतिशत इतकी शैक्षणिक पात्रता इतर प्राध्यापकांकडे दिसून आली. उच्च शैक्षणिक पात्रतेचा अध्यापनावर निश्चितच चांगला उपयोग झाला असावा.

2. अध्यापनाच्या विषयांसंदर्भात बहुसंख्य 57.14 प्रतिशत प्राध्यापकांनी मानसशास्त्र या विषयाचे अध्यापन केले. **शिक्षणाचे अधिष्ठान** शालेय व्यवहार हा विषय 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी शिकविला. त्या खालोखाल शिक्षणाचे तात्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान हा विषय 21.43 प्रतिशत व शास्त्र व गणित अध्यापन पद्धती शिकविणारे 21.43 , **प्रतिशत अध्यापक** होते. इतर अध्यापन पद्धती, तसेच ऐच्छिक विषयाचे अध्यापन करणारांचे प्रमाण अत्यल्प होते.

3. माध्यमिक **शिक्षक म्हणून** एक ते दहा वर्षे अध्यापन अनुभव असणारे बहुसंख्य ( 57.14 प्रतिशत ) प्राध्यापक होते तर अजिबात अनुभव नसणारे 35.71 प्रतिशत प्राध्यापक आढळले. अकरा ते वीस वर्षे माध्यमिक शिक्षक म्हणून अनुभव असणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 7.14 प्रतिशत **इतके** होते.

मेथड मास्टर म्हणून पन्नास प्रतिशत **प्राध्यापकांनी** काम केले होते. व्याख्याता म्हणून एक ते दहा वर्षे अनुभव असणारे 42.85 प्रतिशत प्राध्यापक, अकरा ते वीस वर्षे काम करणारे 14.29 प्रतिशत तर एकवीस ते तीस वर्षे अध्यापन

करणारे 21.43 प्रतिशत प्राध्यापक आढळले. या व्यतिरिक्त 7.14 प्रतिशत प्राध्यापक समन्वयक व 14.29 प्रतिशत प्राध्यापकानी रीडर म्हणून काम पाहिले.

4. सेवांतर्गत प्रशिक्षक म्हणून 42.85 प्रतिशत प्राध्यापकांनी उद्‌बोधन वर्गात तर प्रत्येकी 21.43 प्रतिशत प्राध्यापकांनी चर्चासत्रे व शिबीरे यामध्ये सहभाग घेतलेला दिसून येतो. उत्तर देण्याबाबत 14.29 प्रतिशत प्राध्यापक उदासीन होते. यावरून प्राध्यापक वेळोवेळी आयोजिलेली चर्चासत्रे, उद्‌बोधन वर्ग, शिबीरे, इत्यादींना उपस्थित राहिलेले दिसून आले. हे प्रशिक्षण आयोजित करण्यात एस्. सी. ई. आर्. टी. या संस्थेने 21.43 प्रतिशत एन्. सी. ई. आर्. टी., एस्. एन्. डी. टी., यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ या संस्थांचे प्रत्येकी 14.29 प्रतिशत, तर पुणे विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, रयत शिक्षण संस्था व यु. सी. जी. यांचे प्रत्येकी 7.14 प्रतिशत इतके योगदान होते.

5. म. बा. कुंडले यांचे ' शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र ' हे पुस्तक 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी वाचले तर 21.43 प्रतिशत प्राध्यापकांनी दांडेकर वा. ना यांचे ' ' शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र ' हे पुस्तक वाचल्याचे दिसून आले. त्यापैकी गणित अध्यापन पद्धतीसाठीची विविध पुस्तके वाचणारे 21.43 प्रतिशत प्राध्यापक होते. इतर विषयांची पुस्तके वाचणा-या प्राध्यापकांचे प्रमाण अत्यल्प आहे. शास्त्र अध्यापन पद्धतीची पुस्तके वाचणारे 14.29 प्रतिशत प्राध्यापक होते. यावरून प्राध्यापकांना आपल्या विषयासाठी सर्व संदर्भग्रंथ वाचण्यात रस किंवा अभिरूची नसते असे दिसून आले.

6. मुक्त विद्यापीठाच्या स्वाध्याय पुस्तिकेचा दर्जा चांगला असल्याचे मत बहुसंख्य ( 78.57 प्रतिशत ) प्राध्यापकांनी व्यक्त केलेले दिसले. तर मध्यम दर्जा ( 14.29 प्रतिशत ) व बरा दर्जा ( 7.14 प्रतिशत ) मत असलेले अत्यल्प प्राध्यापक होते. कोणीही ही स्वाध्याय पुस्तिका वाईट असल्याचे मत व्यक्त केले नाही.

7. जरी ही पुस्तिका चांगली असल्याचे मत व्यक्त केले असले तरी तिचा दर्जा सुधारण्यासाठी बहुसंख्य प्राध्यापकांनी ( 57.14 प्रतिशत ) ती विस्तृत करण्यात यावी, तर 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी अभ्यासक्रम सुधारावा असे उपाय सुचविले होते. याबाबत 35.71 प्रतिशत प्राध्यापकांनी मत व्यक्त करण्याचे टाळले.

8. मुक्त विद्यापीठाचे संदर्भ साहित्य पुरेसे मिळते असे 42.85 प्रतिशत तर पुरेसे मिळत नाही असे पन्नास प्रतिशत प्राध्यापकांनी मत व्यक्त केले. उत्तर न देणा-यांचे प्रमाण 7.14 प्रतिशत इतके आढळले. यावरून बहुसंख्य प्राध्यापकानां साहित्य पुरेसे मिळत नसल्याचे दिसून येते.

9. स्वतःच्या विषयातील उपयोजन व कौशल्य ही उद्दिष्टे सर्वच्या सर्व म्हणजे 100 प्रतिशत प्राध्यापकांना अवघड वाटली. ही अवघड उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रशिक्षणाचे उपयोजन पाहाण्याची मूल्यमापन यंत्रणा हवी. ( 14.29 प्रतिशत ) स्वाध्यायात विविधता हवी ( 14.29 प्रतिशत ) हे उपाय प्राध्यापकांनी सुचविले. तर इतर उपायांमध्ये पाठयांशाची वेगळया पद्धतीने मांडणी ( 7.14 प्रतिशत ), तंत्रविज्ञान साहित्याचा पुरवठा ( 7.14 प्रतिशत ), प्रात्यक्षिकासाठी स्वतंत्र चाचणी ( 7.14 प्रतिशत ), व कौशल्याचा सराव ( 7.14 प्रतिशत ) या उपायांचा समावेश होता. उत्तर न देणा-या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण 42.86 इतके होते.

10. मुक्त विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमांच्या दर्जाची तुलना करताना 35.71 प्रतिशत प्राध्यापकांचे शिवाजी विद्यापीठाचा अभ्यासक्रम चांगल्या दर्जाचा तर 35.71 प्रतिशत प्राध्यापकांचे मुक्त विद्यापीठाचा दर्जा चांगला असल्याचे मत आढळून आले. दोन्ही विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांचा दर्जा समान असल्याचे 21.42 प्रतिशत प्राध्यापक म्हणाले. यावरून अभ्यासक्रमाच्या दर्जाबाबत प्राध्यापकांची मते विभिन्न असल्याचे दिसून आले.

11. मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा दर्जा चांगला असण्यामागच्या कारणांमध्ये मूल्यमापन योजना चांगली, विद्यार्थ्यांना पुस्तिकेद्वारे सहज व चांगल्या प्रकारे ज्ञान मिळते, प्रत्येकी ( 28.57 प्रतिशत ), तर ज्ञान देण्याची संयुक्तिक व आधुनिक पद्धती व उपयोजनावर भर प्रत्येकी ( 21.42 प्रतिशत ) ही प्रमुख कारणे आढळली. इतर कारणांमध्ये समाजाच्या गरजावर आधारित ज्ञान (14.29 प्रतिशत) तर सर्वांगीण अभ्यासक्रम ( 7.14 प्रतिशत ) अशा कारणांचा अत्यल्प प्रतिसाद होता, तर 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर दिले नाही.

12. महाविद्यालयांमध्ये चालू विषयांव्यतिरिक्त सुचविलेल्या वैकल्पिक विषयांमध्ये संगणक शिक्षण या विषयावर बहुसंख्य ( 78.57 प्रतिशत ) प्राध्यापकांचा जास्तीत जास्त भर दिसून आला. तर त्या खालोखाल पर्यावरण शिक्षण (35.71 प्रतिशत, व्यावसायिक शिक्षण 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी या विषयांना महत्व दिले. मूल्यशिक्षण अपंग व समस्याप्रधान मुलांसाठी शिक्षण असे अत्यल्प प्राध्यापकांचे मत होते.

13. समूपदेशनामध्ये विद्यार्थी सहभागी न होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी अभ्यास केलेला नसतो असे बहुसंख्य ( 57.14 प्रतिशत ) प्राध्यापकांचे मत आढळले. तर इतर कारणांमध्ये विद्यार्थ्यांना कृतीबाबतच्या सूचना नसतात व मत प्रकट करण्यास घाबरतात ( प्रत्येकी 21.42 प्रतिशत ) अशी कारणे आढळली. विषयज्ञानातील मागासलेपणा व केवळ पदवीकरीता विद्यार्थी येतो असे अत्यल्प ( 7.14 प्रतिशत )

प्राध्यापकांना वाटते. उत्तर न देणारे 28.57 प्रतिशत प्राध्यापक आढळले. त्यामुळे त्यांना समुपदेशनात रस नसल्याचे आढळले.

14. समुपदेशात सहभागी होण्यासाठी सुचविलेल्या उपायांमध्ये प्रामुख्याने शैक्षणिक साहित्याची वेळेवर उपलब्धता 35.71 प्रतिशत, योग्य प्रश्नपद्धतीचा वापर 14.29 प्रतिशत व पुस्तिकेच्या वापरासाठी उपक्रम 14.29 प्रतिशत या उपायांचा समावेश होता. क्लृप्त्यांचा वापर, प्रेरणा, योग्य स्वाध्याय, पदवीची आवश्यकता पटविणे व वैयक्तिक लक्ष देणे हे उपाय अत्यल्प ( प्रत्येकी 7.14 प्रतिशत ) प्राध्यापकांनी सुचविले होते.

15. अध्यापन करताना 35.71 प्रतिशत प्राध्यापकांनी चित्रे व तक्ते तर 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी उर्ध्वशीर्ष, प्रक्षेपक यांचा वापर केला. त्या खालोखाल प्रतिकृती, टेपरेकॉर्डर ( प्रत्येकी 21.42 प्रतिशत ) तर नकाशे ( 14.29 प्रतिशत ) व रेषाकृती ( 7.14 प्रतिशत ) वापरणारे अत्यल्प प्राध्यापक आढळले.

16. प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन करताना बहुसंख्य प्राध्यापकांना ( 85.71 प्रतिशत ) मूल्यमापनासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याचे दिसून आले.

17. प्रात्यक्षिक पूर्ण नसतानादेखील अंतर्गत गुण कमी पडतात या कारणास्तव सढळ हाताने गुणदान करावे लागते, या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः सहमत होते तर 21.42 प्रतिशत प्राध्यापक सहमत दिसून आले, तर 28.57 प्रतिशत प्राध्यापक असहमत व 21.42 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः असहमत आढळले. यावरून या विधानाबाबत प्राध्यापकांचा संमिश्र प्रतिसाद दिसून आला.

18. सूक्ष्म अध्यापनातील पाठांचे निरीक्षण करण्याकरिता दिलेले नोंदपत्रक योग्य आहे म्हणजेच चांगल्या प्रतीचे आहे असे बहुसंख्य ( 71.43 प्रतिशत ) प्राध्यापकांना

वाटले, तर नोंदपत्रक योग्य नाही असे 14.29 प्रतिशत प्राध्यापकांचे मत आढळले. इतर म्हणजे 14.29 प्रतिशत प्राध्यापक उत्तर देण्यास उदासीन दिसले.

19. सूक्ष्म अध्यापनासाठी निवडलेल्या कौशल्यांचे निदान करण्याची पद्धती योग्य असल्याचे शंभर प्रतिशत प्राध्यापकांनी मत व्यक्त केले आहे व ही पद्धती योग्य असण्यामागची प्रमुख कारणे अध्यापनानंतर निदान ( 28.57 प्रतिशत ), व टेपरेकॉर्डर व निरीक्षणसूचीच्या साहाय्याने निदान ( 21.42 प्रतिशत ) ही असल्याचे दिसले. इतर कारणांना उदा. मूल्यांचे निदान ( 14.29 प्रतिशत ) विद्यार्थी चांगल्या प्रकारे निदान करतो. घटक कौशल्ये व वेळेचे नियोजन दिले आहे. ( प्रत्येकी 7.14 प्रतिशत ) अल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसले. किंबहुना ही कारणेच संयुक्तिक वाटली नाहीत.

20. सूक्ष्म अध्यापन कृतीसत्रात प्रत्याभरण चांगले होण्यासाठी सुचविलेल्या उपायांमध्ये प्रामुख्याने उणीवा सांगून त्या टाळावयास लावणे व जास्त निरीक्षकांना संधी देणे ( 21.42 प्रतिशत ) तर सुधारणा होईपर्यंत मूल्यमापन, स्वतः कृती दाखविणे, योग्य त्या सूचनांची स्पष्ट नोंद व सूचनांचे पालन होते किंवा नाही हे पाहणे ( प्रत्येकी 14.29 प्रतिशत ) या उपायांचा उल्लेख होता. इतर उपायांचे प्रमाण अत्यल्प आढळले.

21. सूक्ष्म अध्यापन पाठात अध्यापन पुनराध्यापन सत्राची कौशल्य मिळेपर्यंत पुनरावृत्ती होत नाही, या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः सहमत तर पन्नास प्रतिशत प्राध्यापकांनी सहमती दर्शविली. म्हणजेच बहुसंख्य प्राध्यापकांनी कौशल्य मिळेपर्यंत पुनरावृत्ती केली जात नाही हे मान्य केले.. असहमत असणारे 21.42 प्रतिशत प्राध्यापक होते.

22. सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे सूक्ष्मपणे मूल्यमापन न झाल्याने सूक्ष्म अध्यापनाचा हेतू साध्य होत नाही असे बहुसंख्य प्राध्यापकांचे ( 28.57 प्रतिशत ) - पूर्ण सहमती तर 42.86 प्रतिशत सहमती दर्शविली. यावरून सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे सूक्ष्म मूल्यमापन होत नाही हे सिद्ध झाले.

23. सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबत बहुसंख्य प्राध्यापक ( 57.14 प्रतिशत ) असंतुष्ट आढळले तर 35.71 प्रतिशत प्राध्यापक समाधानी होते.

24. सरावपाठाच्या मूल्यमापनातील उणीवांमध्ये मार्गदर्शन व निरीक्षण योग्य नाही ( 21.42 प्रतिशत ), तसेच विद्यार्थ्यांची तयारी अपुरी ( 21.42 प्रतिशत ), एकाच पद्धतीचा वापर ( 14.29 प्रतिशत ) या उणीवा दिसून आल्या. तर आंतरक्रिया कमी असे 21.42 प्रतिशत प्राध्यापकांचे मत दिसून आले. इतर उणीवांमध्ये सरावपाठ केवळ उरकला जातो व केंद्रावर केवळ दोनच पाठ असतात ( 7.14 प्रतिशत ) या उणीवांचा समावेश होता.

25. सरावपाठांच्या मूल्यमापनाबाबत प्रामुख्याने 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी अध्यापन पद्धतीनुसार पाठपरीक्षण करावयास मिळावे असे मत व्यक्त केले तर तेवढेच म्हणजे 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी समक्ष मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. इतर उपायांमध्ये पद्धतीचा योग्य वापर ( 21.42 प्रतिशत ), सरावपाठ योग्य होईपर्यंत प्रत्याभरण ( 14.29 प्रतिशत ) व केंद्राकडे निम्मे सरावपाठ ( 7.14 प्रतिशत ) या उपायांचा अल्प समावेश होता.

26. विद्यार्थ्यांचा पहिला पाठ व शेवटचा पाठ यात फरक नसतो. या विधानाशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक असहमत तर 35.71 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः

असहमत आढळले. म्हणजेच बहुसंख्य प्राध्यापकांनी असहमती दर्शविली. तर 21.42 प्रतिशत प्राध्यापक सहमत व 14.29प्रतिशत प्राध्यापक पूर्णत: असहमत दिसले.

27. सरावपाठ दर्जेदार होण्यासाठी सुचविलेल्या उपायांमध्ये प्रामुख्याने पाठनिरीक्षक योग्य नेमावेत ( 28.57 प्रतिशत ), वर्गनियंत्रण चांगले हवे ( 14.29 प्रतिशत ), पूर्वतयारी झाल्यावरच पाठ घेण्यास परवानगी ( 14.29 प्रतिशत ), तर योग्य पाठनिरीक्षण, योग्य मूल्यमापन व मार्गदर्शन ( 14.29 प्रतिशत ) या उपायांचा समावेश होता. इतर उपायांचे प्रमाण अत्यल्प होते.

28. साहाध्यायी पर्यवेक्षित सरावपाठामधील सुधारणांसंदर्भात नि:पक्षपातीपणे निरीक्षण करून सूचना कराव्यात. यामध्ये कटुता स्वीकारण्याची तयारी नसते. तसेच प्राध्यापकांचे किंवा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे असे बहुसंख्य ( 71.42 प्रतिशत ) प्राध्यापकांनी मत व्यक्त केले.

29. सहशालेय उपक्रमांमध्ये सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांना 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी पुन्हा सहभागी करून, 14.29 प्रतिशत ढोबळमानाने तर 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी अत्यल्प गुण दिले असल्याचे दिसून आले तर 42.86 प्रतिशत प्राध्यापकांनी उत्तर देण्यास असमर्थता दाखविलेली दिसली.

30. विद्यार्थ्यांची गुणवत्ता व प्राध्यापकांनी केलेले मूल्यमापन यात फरक नसतो. असे बहुसंख्य प्राध्यापकांचे ( 85.81 प्रतिशत ) मत दिसून आले. तर 14.29 प्रतिशत प्राध्यापकांना फरक असतो असे वाटले.

31. प्रत्यक्ष समाजसेवा करताना बहुसंख्य ( 57.14 प्रतिशत ) प्राध्यापकांनी गुण दिले, तर सवडीने किंवा नंतर कधीतरी गुणदान करणारे 35.17 प्रतिशत प्राध्यापक होते.

32. समाजसेवेचा कार्यक्रम व त्याचे होणारे गुणदान ( मूल्यमापन ) यात तारतम्य नसते या विधानाशी बहुसंख्य प्राध्यापकांनी ( 35.71 प्रतिशत ) पूर्णतः असहमती 35.71 प्रतिशत प्राध्यापकांनी असहमती दर्शविली. तर अल्प ( 28.57 प्रतिशत) प्राध्यापकांनी पूर्णतः सहमती दर्शविलेली आढळली. यावरून समाजसेवेच्या प्रात्यक्षिकाचे गुणदान बहुसंख्य प्राध्यापकांनी वस्तुस्थितीला धरून केले होते असे दिसून आले.

33. बहुसंख्य प्राध्यापकांचे ( 57.14 प्रतिशत ) मत कार्यानुभव अहवालातील साम्याचा विद्यार्थ्यांच्या गुणावर परिणाम होतो याबाबत अनुकूल आढळले तर 42.86 प्रतिशत प्राध्यापकांचे मत प्रतिकूल होते.

34. स्वाध्याय तपासल्यानंतर त्यांचे प्रत्याभरणामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणदोषांची कल्पना बहुसंख्य ( 64.28 प्रतिशत ) प्राध्यापकांनी दिली तर 28.57 प्रतिशत प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रत्याभरण न दिल्याचे आढळून आले.

35. स्वाध्यायात भरमसाट गुण दिले जातात या मताशी 28.57 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः असहमत तर 21.42 प्रतिशत प्राध्यापक असहमत असलेले दिसून आले तर 14.29 प्रतिशत प्राध्यापकांनी सांगता येत नाही असे उत्तर दिलेले आढळले. अत्यल्प म्हणजेच 7.14 प्रतिशत प्राध्यापकांनी सहमती दर्शविलेली आढळली. म्हणजेच स्वाध्यायाच्या गुणदानाबाबत प्राध्यापकांमध्ये मतभिन्नता दिसून आली.

36. स्वाध्यायामुळे वार्षिक परीक्षेवर प्रतिकूल परिणाम होतो या संदर्भातील विधानाशी 21.42 प्रतिशत प्राध्यापक पूर्णतः असहमत तर 28.57 प्रतिशत प्राध्यापक असहमतीचे दिसून आले. तर पूर्णतः सहमत व सहमत असलेल्या प्राध्यापकांचे प्रतिशत प्रमाण प्रत्येकी 14.29 आढळले.

सांगता न येणा-यांचे प्रमाण 21.42 प्रतिशत इतके होते. यावरून स्वाध्यायांची संख्या व त्याची उपयुक्तता याबाबत मतभिन्नता दिसून आली.

37. केवळ दोन पाठांवरून विद्यार्थी शिक्षकाचे मूल्यमापन करणे योग्य नाही या मताशी बहुसंख्य ( 64.28 प्रतिशत ) प्राध्यापकांनी सहमती दर्शविली आहे. त्यामुळे सरावपाठांच्या मूल्यमापनाच्या दर्जाबाबत संदिग्धता दिसून येते.

38. मुंबई विद्यापीठाप्रमाणे वार्षिक पाठ रद्द करावेत असे न वाटणारे बहुसंख्य ( 64.28 प्रतिशत ) प्राध्यापक होते तर मुंबई विद्यापीठाप्रमाणे वार्षिक पाठ रद्द करावेत असे 28.57 प्रतिशत प्राध्यापकांचे मत आढळले.

39. क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षण संकल्पना राबवावी या मताशी पन्नास प्रतिशत प्राध्यापक म्हणजे निम्मे प्राध्यापक पूर्णतः सहमत ती 21.42 प्रतिशत सहमत होते. यावरून त्यांना क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व पटल्याचे दिसून आले.

40. वर्षातील दैनंदिन कामाचा सुट्टीतील मुक्त विद्यापीठाच्या कामावर प्रतिकूल परिणाम होतो असे बहुसंख्य ( 57.14 प्रतिशत ) प्राध्यापकांचे मत दिसून आले.

41. मुक्त विद्यापीठाच्या कामावरील विपरीत परिणाम टाळण्यासाठी पर्यायी योजनामध्ये विद्यापीठात अभ्यासक्रम घ्यावा, तसेच पर्यायी रजा मिळावी ( प्रत्येकी 21.42 प्रतिशत ) तर रिटायर्ड लोक नेमावेत, वेगळा नवीन अध्यापक वर्ग नेमावा, मानधन वाढवावे ( प्रत्येकी 14.29 प्रतिशत ) हे उपाय प्राध्यापकांनी सुचविले होते. तर प्रशिक्षण कालावधी वाढविणे व कोर्सेस बंद करणे हे उपाय प्रत्येकी 7.14 प्रतिशत म्हणजेच अत्यल्प प्राध्यापकांनी सुचविले.

42. मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम अधिक परिणामकारकरित्या राबविण्यासाठी प्राध्यापकांनी अनेक दर्जेदार उपाय सुचविले. त्यामध्ये शंभर प्रतिशत म्हणजे सर्वच्या सर्व प्राध्यापकांनी **मानधन वाढवावे,** उपाय सुचविला आहे. यावरून मुक्त विद्यापीठाकडून प्राध्यापकांना मिळणारे मानधन अपुरे असल्याचे दिसून येते. त्या खालोखाल प्रशासकीय यंत्रणेचे निरीक्षण, नियंत्रण व मार्गदर्शन व्हावे असे पन्नास प्रतिशत तर संपर्कसत्रांचा कालावधी वाढवावा असे उपाय 42.85 प्रतिशत प्राध्यापकांनी सुचविले.

मार्गदर्शक पुस्तिका सविस्तर स्वरूपात व वेळेवर उपलब्ध व्हाव्यात ( 35.71 प्रतिशत ), अकार्यक्षम केंद्रे बंद करावीत ( 21.42 प्रतिशत ), विभागीय केंद्रे असवीत ( 21.42 प्रतिशत ), हे उपायसुद्धा महत्वाचे वाटले.

इतर उपायामध्ये प्रात्यक्षिकामध्ये विविधता असावी ( 14.29 प्रतिशत ), विद्यापीठातच अभ्यासक्रम राबवावा ( 7.14 प्रतिशत ), अभ्यासक्रम तज्ज्ञांच्या मदतीने तयार करावा ( 7.14 प्रतिशत ), विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करावी ( 7.14 प्रतिशत ) व केंद्रावरील अडचणी जाणून त्या सोडवाव्यात ( 7.14 प्रतिशत ) हे उपाय अत्यल्प प्राध्यापकांनी सुचविले.

मुलाखतीवरून निष्कर्ष :

1. केंद्रसंचालक :

   1. बी. एड्. अभ्यासक्रम राबविताना प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. सेवकांवर ताण येवून त्यांची काम करण्याची मानसिक तयारी नसते.

   2. मुक्त विद्यापीठाकडून मिळणा-या मानधनावरून मतभेद निर्माण होतात व कॉलेजमधील वातावरण बिघडते.

   3. मुक्त विद्यापीठ बी. एड. शिक्षणक्रम व नियमित बी. एड. शिक्षणक्रम यांत विविध बाबींमध्ये तफावत आहे. तरी दोन्ही शिक्षणक्रमांचा दर्जा समान आहे.

   4. मुक्त विद्यापीठ शिक्षणक्रमाबाबत विद्यापीठाचे नियंत्रण व मार्गदर्शन होत नाहीत. निरीक्षकांच्या केंद्रांना भेटी होत नाहीत.

   5. अभ्याससाहित्य केंद्राना वेळेवर पोहाचत नाही.

   6. बी. एड्. शिक्षणाचा कालावधी कमी असल्याने अभ्यासक्रम कसातरी पूर्ण केला जातो.

2. समन्वयक :

   1. अभ्यासक्रमाबाबत व्यवहार्य दृष्टीकोन नाही.

   2. मुक्त विद्यापीठाकडून दिले जाणारे मानधन कमी आहे. वेळापत्रकातील काही तासिकांना मानधन नाही. मानधनाबाबत समन्वयक समाधानी नाहीत.

3. प्रात्यक्षिकांच्या मूल्यमापनाबाबत समन्वयक अनुमाधानी आहेत.

4. प्रशिक्षणार्थी अभ्यासक्रम कसातरी पूर्ण करण्याच्या मागे असतात.

5. प्रशिक्षणार्थी संदर्भांचे वाचन करीत नाहीत त्यामुळे समंत्रणात सहभागी होत नाहीत.

3. प्रशिक्षणार्थी :

1. बी. एड्. शिक्षणक्रम सत्रे सुट्टीत असल्याने अनंत अडचणी निर्माण होतात.

2. काही स्वयंअध्ययनपुस्तिका वेळेवर उपलब्ध होत नाहीत.

3. मनावर दडपण येत असल्यामुळे समंत्रणात सहभागी होत नाही.

4. सरावपाठ घेण्यासाठी त्या त्या शाळांत पुरेसे साहित्य उपलब्ध होत नाही. तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक उपलब्ध असत नाहीत.

5. सहाध्यायी विद्यार्थ्यांमुळे अभिरूप अध्यापनात कृत्रिमता येते.

5.3. शिफारशी :

1. पाठयक्रम एक व तीन यामध्ये सुबोधता यावी याकरिता त्यांची परिणामकारकता वाढवून त्यांची पुनर्रचना करावी.

2. विद्यार्थ्यांना वेळेत संदर्भ उपलब्ध करून द्यावेत यासाठी केंद्रांना संदर्भग्रंथ खरेदी करण्यासाठी ठोस आर्थिक मदत द्यावी. संदर्भग्रंथांचे वाचन करावे यासाठी वेगळा उपक्रम म्हणून क्रेडिट गुण द्यावेत.

3. मुक्त विद्यापीठांच्या स्वाध्यायपुस्तिकांचा दर्जा आणखी सुधारण्यासाठी उपाययोजना करावी तसेच स्वाध्यायपुस्तिकांच्या वितरण व्यवस्थेतही सुधारणा व्हावी. स्वाध्यायपुस्तिकांचे लेखन हे अनेक विषयतज्ज्ञांच्या सहकार्याने करण्यात यावे, याकरिता शक्य झाल्यास इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे मार्गदर्शन व सहकार्य घ्यावे.

4. अभ्यासक्रम सत्रांचा कालावधी तीन ऐवजी चार करण्यात यावा.

5. अभ्याससत्रांच्या वेळेच्या मर्यादेमुळे प्रशिक्षणार्थींना पुरेसे मार्गदर्शन मिळू शकत नाही. याकरिता प्रशिक्षणार्थींनी इतर कालावधीमध्ये प्राध्यापकांची भेटीची वेळ पत्राद्वारे ठरवून मार्गदर्शन घ्यावे.

6. सूक्ष्म अध्यापन पाठ व सरावपाठ यांचे दिग्दर्शन प्रशिक्षणार्थींना पाहावयास मिळतेच परंतु त्यांची परिणामकारकता आणखी वाढविण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे आदर्श पाठ व्हिडिओ फिल्म्समधून दाखविण्यात यावेत.

7. प्रशिक्षणार्थींच्या स्वत:च्या पाठाचे व्हिडिओचित्रण करून त्याद्वारे स्वयंप्रत्याभरणासाठी त्याचा उपयोग करून घ्यावा.

8. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी दिला जाणारा कालावधी पुरेसा असावा. तसेच प्रात्यक्षिकांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्याकडे प्राध्यापक, समन्वयक व केंद्रसंचालक यांनी लक्ष द्यावे.

9. एकविसाव्या शतकातील शिक्षकापुढील आव्हानांचा विचार करून शैक्षणिक तंत्रविज्ञान हा विषय सक्तीचा करण्यात यावा. तसेच शक्य झाल्यास दोन ऐच्छिक विषय सुरू करावेत. व ते निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना द्यावे.

10. प्रशिक्षणार्थींचे शालेय सरावपाठ इतर शिक्षकांनी पाहाण्याऐवजी त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी पाहावेत याकरिता मुक्त विद्यापीठाने त्यांचे मानधन वाढवावे.

11. सहाध्यायी पर्यवेक्षित सरावपाठामध्ये सहाध्यायांकडून वस्तुनिष्ठ निरीक्षण व्हावे याकरिता केंद्राने नियंत्रण यंत्रणा राबवावी.

12. प्राध्यापकांकडून परिणामकारक अध्यापन व्हावे याकरिता त्यांचे मानधन वाढवावे तसेच दिल्या जाणा-या मानधनावर प्राप्तीकर आकारण्यात येऊ नये याची मुक्त विद्यापीठाने दक्षता घ्यावी.

13. प्राध्यापकांच्या मानधनांचे वितरण करण्यासाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्र रोखपाल पाठवावा.

14. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व त्यांचा सराव होण्यासाठी अंतर्गत मूल्यमापनामध्ये चाचण्यांची संख्या वाढवावी.

15. मुक्त विद्यापीठाने वेळोवेळी भेटी देऊन केंद्रांच्या कार्यक्षमतांची तपासणी करावी व अकार्यक्षम केंद्रे बंद करावीत.

16. मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम परिणामकारकपणे राबविण्यासाठी, वेळोवेळी निरीक्षण, मार्गदर्शन व नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय केंद्रे निर्माण करावीत.

17. मुक्त विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांची पुनर्रचना तज्ज्ञांच्या साहाय्याने करण्यात यावी.

18. मुक्त विद्यापीठाने सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी वेगळा अध्यापकवर्ग नेमावा.

19. दूरशिक्षण ही ज्ञानशाखा म्हणून विकसित होण्यासाठी प्रयत्न करावेत.

20. दूरशिक्षणाकडे सर्व स्तरातील बुद्धिवंत व प्रज्ञावंत लोकांना आकर्षित करावे.

21. शिक्षक, प्रशासक व इतर सेवक यांना कार्यक्रमांचे नियोजन, स्वाध्याय तपासणी, अनुलेखन, व्यक्तीभेटी, संगणक वापर, कार्यालय व्यवस्था, दृक - श्राव्य साधन निर्मिती, संप्रेषणतंत्र इ. संबंधी उजाळा व उद्बोधन वर्ग आयोजित करावेत.

22. दूरस्थ अभ्यासकांच्या मूल्यमापनासाठी विकासात्मक व एकात्म मूल्यमापनाचा वापर करावा. त्याकरिता क्वालिटी ॲश्योअरन्स सारख्या तंत्रांची मदत घ्यावी.

23. दूरशिक्षणावरील आधारित प्रकल्पांना अनुदान द्यावे.

5.4. पुढील संशोधनासाठी क्षेत्रे :

1. महाराष्ट्रातील सर्व मुक्त विद्यापीठांबाबतच्या अध्यापकवर्ग व कर्मचारी वर्गाच्या प्रतिक्रियांचा समीक्षात्मक अभ्यास.

2. मुक्त विद्यापीठ व पारंपरिक विद्यापीठ यांच्या बी. एड्. अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास.

3. मुक्त विद्यापीठांच्या संदर्भसाहित्याचा चिकित्सक अभ्यास.

4. मुक्त विद्यापीठांच्या विविध केंद्रावरील विद्यार्थीसेवा यंत्रणा व कार्यालयीन सेवा यंत्रणा यांचा समीक्षात्मक अभ्यास.

5. संधीवंचितांच्या व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रमाबाबतचा प्रतिक्रियाबाबतचा समीक्षात्मक अभ्यास.

6. मुक्त विद्यापीठांच्या विविध केंद्रांच्या कार्यक्षमतांचा चिकित्सक अभ्यास.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## संदर्भग्रंथ सूची


बापट, भा. गो. ' शैक्षगिक संशोधन
पुणे : व्हिनस प्रकाशन, 1975, 216 पृ.पृ.

बेस्ट, जॉन. डब्ल्यू. रिसर्च इन एज्युकेशन,
नवी दिल्ली : प्रेन्टिस हॉल ऑफ इंडिया प्रा. लि.
1963, 320 पृ.पृ. 1963, पृपृ.

बेटस्, ए. डब्ल्यू दि रोल ऑफ टेक्नॉलॉली इन डिस्टन्स एज्युकेशन,
न्यूयॉर्क : सेन्ट मॉन्टॉस प्रेस, 231 पृपृ.

बोराह, स्वप्ना. डिस्टन्स एज्युकेशन,
दिल्ली : अमर प्रकाशन, 1987, 306 पृपृ

बी. एड्. मार्गदर्शिका,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 1999

दांडेकर, वा. ना. शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,
पुणे : श्री विद्या प्रकाशन, 1974 409 पृपृ.

फिप-थ सर्व्हे ऑफ एज्युकेशनल रिसर्च, 1988-91
दिल्ली : एन्. सी. इ. आर्. टी. पब्लिकेशन
डिव्हिजन, 1997.

जगताप, ह. ना. शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने.
पुणे : नूतन प्रकाशन, 1995, 247 पृ.पृ.

कोठारी, सी. आर्. रिसर्च मेथॉडॉलॉजी मेथडस् ॲन्ड टेक्निक्स्,
नवी दिल्ली : विली इस्टर्न लि. 1990, 468 पृपृ

मुळे, रा. शं., उमाठे, वि. तु. शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,
नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,
1977, 405 पृपृ.

रेड्डी, जी. राम. ( संपादक ) ओपन युनिव्हर्सिटी आयव्हरी टॉर्वर्ड थ्रोन ओपन.
दिल्ली : स्टर्लिंग पब्लिशर्स, प्रा. लि. 1988, 270पृष्ठ.

रिपोर्ट ऑफ दि सेकंडरी एज्युकेशन कमिशन,
दिल्ली : पब्लिकेशन डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, 1953

रिपोर्ट ऑफ दि एज्युकेशन कमिशन,
दिल्ली : पब्लिकेशन डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, 1964-66

संपत, के. इन्ट्रॉडक्शन टू एज्युकेशनल टेक्नॉलॉजी,
न्यू दिल्ली : स्टर्लिंग पब्लिशर्स प्रा. लि. 1981 282 पृष्ठ.

शेटे, एस्. टी., कदम, सी. पी. शिक्षणातील विचार प्रवाह,
सातारा. समर्थ प्रकाशन, 1999, 199 पृष्ठ.

शेटे, शा. शं. , केसकर पु. दि. शालेय संशोधन प्रकल्प,
कोल्हापूर : महाराष्ट्र ग्रंथ भांडार, 1972, 130 पृष्ठ

ताकवले, राम. कुलगुरूंचे मनोगत,
शिक्षणाचे अधिष्ठान, तात्विक, सामाजिक व सांस्कृतिक,
नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, प्रकाशन 1992 62पृष्ठ.